**MHPA220007532022**

## किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १७८/२०२२ अर्ज नि. १ वरील पारित आदेश

(पारित दिनांक २१/१०/२०२२)

१– सदरचा अर्ज हा अर्जदार बालासाहेब मारोतराव भालेराव यांनी त्यांच्या मालीकीची जप्त असलेली स्प्लेंडर प्लस मोटार सायकल जिचा क्रमांक एम.एच.२२–ए.जे ८६४८ ही सुपूर्दनाम्यावर परत मिळवण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४५७ अन्वये दाखल केलेला आहे.

२– सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे नमुद केले आहे की, त्याच्या मालकी व ताब्यातील स्प्लेंडर प्लस मोटार सायकल जिचा क्रमांक एम.एच.२२–ए.जे ८६४८ जिचा चेसीस नं. MBLHA10CGGHK44773 इंजीन नं. HA10ERGHKH51208 ही गुन्हा क्र. १९६/२०२१ भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ मध्ये पोलीस स्टेशन पालम यांनी जप्त करून त्यांच्या ताब्यात ठेवलेली आहे. सदरची मोटार सायकल ही त्याच्या मालकीची असुन दैनंदीन वापराची आहे. सदर मोटार सायकल ही बंद अवस्थेत राहिल्यास त्याचे सुटेभाग खराब होवून नुकसान होईल. त्यामुळे जप्त करण्यात आलेले वाहन सुपूर्तनाम्यावर देण्याची अर्जदाराने विनंती केली आहे.

३– सदर अर्जाच्या अनुषंगाने तपासीक अंमलदार व सरकारी वकील यांचे म्हणणे मागवण्यात आले. तपासीक अंमलदार यांनी त्यांचे नि. क्र. ०६ वर म्हणणे दाखल करून सदर जप्त मोटार सायकल अर्जदारास परत करण्यास त्यांची हरकत नसल्याबाबत कळवले आहे. तसेच सरकारी वकिलांनी नि.क्रं.१ वर म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश पारित होण्यास विनंती केली आहे.

४– प्रस्तुतचा अर्ज वाचला. अर्जदाराचे वकील श्री. एस. आर. रोकडे व सरकारी वकील श्री. एस. आर. कुलकर्णी यांचे म्हणणे ऐकले. प्रकरणात दाखल करण्यात आलेले वाहन हे गु.र.नं. १९६/२०२१ भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ अंतर्गत जप्त करण्यात आल्याचे दिसते. अर्जदाराने त्याची मालकी व ताबा सिध्द करण्यासाठी त्याच्या आधारकार्डची पडताळणी प्रत नि. क्र. ०९ वर, वाहनाच्या आर.सी. बुकची पडताळणी प्रत नि. क्र. १० वर, वाहनाच्या विमा पॉलीसीची मुळ प्रत वस्तू –अ वर व प्रथम खबरी अहवालाची छायांकित प्रत वस्तु–ब वर दाखल केलेली आहे.

५– अर्जदाराने दाखल केलेल्या नि.क्रं.१०वरील आर.सी. बुकचे अवलोकन केले असता, सदरची वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ व माननीय सर्वोच्च न्यायालयाचे सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गूजरात सरकार या प्रकरणातील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, न्यायालयाने पोलीसांनी जप्त केलेला मुद्देमाल हा विनाविलंब योग्य त्या ताबेदाराकडे सुपूर्द करणे बंधनकारक आहे. सदर प्रकरणात प्रथम दर्शनी अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक असल्याचे कागदपत्रावरून दिसुन येते. याउपर सदर मोटार सायकल ही पोलीस स्टेशन पालम येथे असल्याचे दिसुन येते. त्यामुळे हवामानाचा सदर जप्त वाहनावर परिणाम होउन ती खराब होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

६– त्यामुळे त्यांसंबंधी तश्या अटी व शर्ती घालुन सदर वाहन अर्जदारास परत करणे योग्य वाटते. जप्त करण्यात आलेले वाहन पोलीस स्टेशन पालम येथे पडुन राहिल्यास तिची उपयुक्तता कमी होण्याची अथवा ती खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर जप्त वाहन अर्जदारास सुपूर्तनाम्यावर अटी व शर्तीवर परत करणे न्यायोचित वाटते. म्हणुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## **आदेश**

१– प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२– गुन्हा क्र. १९६/२०२१ पोलीस स्टेशन पालम यांनी जप्त केलेली स्प्लेंडर प्लस मोटार सायकल जिचा क्रमांक एम.एच.२२–ए.जे ८६४८ जिचा चेसीस नं. MBLHA10CGGHK44773 इंजीन नं. HA10ERGHKH 51208 ही कोणासही विक्री करणार नाही, गहाण ठेवणार नाही अथवा त्याच्या रंग व स्वरूपात बदल करणार नाही व अशा प्रकारच्या गुन्ह्याच्या कामी वापरणार नाही व न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे सदर गुन्हयात हजर करेन अन्यथा रक्कम रू. ८०,०००/– (रूपये ऐंशी हजार केवळ) दंड भरेन असा सुपूर्तनाम्यावर देण्यात यावी.

३– अर्जदारास असे आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराने न्यायालय आदेश देईल त्यावेळी गुन्ह्याच्या कामी जप्त केलेले वाहन न्यायालयासमक्ष अथवा तपास कामी तपासीक अंमलदार यांच्याकडे हजर करावी.

४– तपासीक अंमलदारास असे आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराने वरील आदेशाप्रमाणे सुपूर्तनामा दिल्यानंतर जप्त वाहन अर्जदारास देण्यात यावे.

५– जप्त करण्यात आलेल्या मोटार सायकलचे सोईस्कररित्या छायाचित्र काढण्यात यावी. छायाचित्राचा खर्च अर्जदाराने करावा.

६– तपासीक अंमलदाराने सुपूर्तनामा वगैरे कागदपत्रे दोषारोपपत्रा सोबत सादर करावे.

VAISHALI DIGAMBERRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBERRAO SHIRSE
Date: 2022.10.21 17:50:43 +0530

दिनांक २१/१०/२०२२.

(श्रीमती व्ही. डी. शिरसे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पालम,
जि. परभणी.